# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग,नाशिक

आदिवासी विकास भवन, तळ मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

महाराष्ट्र शासन दुरध्वनी क्रमांक (०२५३)२५७५८१६,२५७७०४५,२५७८५६८ फॅक्स (०२५३) २५७८५६८


क्रमांक शाआशा/पुरवठा-२०१८/प्र.क्र.०४/का.६(२)/३०१८

नाशिक

दिनांक :- १३ एप्रिल, २०१८

प्रति,

१) मे.एजीटी फुडस् इंडीया प्रा.लि., भांडुप (प.), मुंबई
२) मे.आशिष ट्रेडींग कंपनी, सालगांव, आंबेगांव, पुणे
३) मे.गौरी एंटरप्रायझेस, जिल्हा पेठ, जळगांव
४) मे.महाराष्ट्र स्टेट को-ऑप कंझ्युमर्स फेडरेशन लि., दानाबंदर, मुंबई
५) मे.पारसेवार अॅण्ड कंपनी, नवा मोंढा, नांदेड
६) मे.राजन बच्चुमल अॅण्ड कंपनी, नाशिकरोड, नाशिक
७) मे.श्री साई मार्केटींग अॅण्ड ट्रेडींग कंपनी, खानदेश मिल कंपाऊंड, जळगांव
८) मे.विची अॅग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि., नवी मुंबई, ठाणे
९) मे.विश्वभारती फुडस् प्रा.लि., कलंत्री हाऊस, शिवाजी रोड, नासिक रोड

**विषय :-** ई-निविदा २०१८-१९ अंतर्गत प्रसिध्द करण्यांत आलेल्या १) निविदा क्रमांक ५१०४-अन्नधान्य, कडधान्य पुरवठा करणे या निविदेच्या प्रक्रियेबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं-२०१४/प्र.क्र.८२/ भाग III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१७.

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक शाआशा- २०१५/ प्र.क्र.३४१/का.१३, दिनांक १५ जुन, २०१७

सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात शासकिय आश्रम शाळा / शासकिय वसतिगृहांना अन्नधान्य कडधान्य इतर किराणा माल, शैक्षणिक साहित्य व इतर वस्तुंचा पुरवठा करण्यासाठी शासनाने संदर्भिय शासन निर्णया अन्वये मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली खरेदी समिती क्र. २ गठीत करण्यात आलेली आहे.

२/- शासन निर्णय दिनांक १५ जुन, २०१७ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात -शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी १) निविदा क्रमांक ५१०४-अन्नधान्य, कडधान्य पुरवठा करणे पुरवठा करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर प्राप्त निविदांचा तांत्रिक लिफाफा दिनांक २१.०३.२०१८ रोजी उघडण्यात आलेला आहे. दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी तांत्रिक लिफाफ्यातील पात्र/अपात्र निविदाधारकांची बैठक आयोजित करण्यांत आलेली आहे. सदर बैठकीत आपण निविदेसोबत सादर केलेल्या तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांनुसार पात्र/अपात्र निविदाधारक निश्चित करण्यांत येणार आहे. त्यानंतर पात्र निविदाधारकांचे ऑनलाईन ई-निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रयोगशाळा तपासणीसाठी नमुने जमा करणे आणि प्रयोगशाळा तपासणी फी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी कार्यालयात जमा करण्याची कार्यवाही करण्यांत येणार आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक व निविदेचे नांव | निविदेतील एकुण बाबी | बाबनिहाय प्रयोगशाळा तपासणी फी (रुपयांत) | एकुण प्रयोगशाळा तपासणी फी (रुपयांत) |
|---|---|---|---|---|
| १ | ५१०४-अन्नधान्य, कडधान्य | ११ (अकरा) | रु.२६०/- | रु.२,८६०/- |

३/- विहित वेळेत प्रयोगशाळा तपासणीसाठी नमुने जमा करणे आणि प्रयोगशाळा तपासणी फी जमा करु न शकल्यास आपणांस ऑनलाईन ई-निविदा प्रक्रियेतुन बाद करण्यांत येईल. तसेच, शासन निर्णय दि.१ डिसेंबर २०१६ मध्ये नमुद केल्यानुसार आपणांवर पुढील कारवाई करण्यांत येईल, याची कृपया नोंद घ्यावी. तरी उपरोक्त प्रमाणे दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी दुपारी २.३० वाजता बैठकीस उपस्थित राहुन, तांत्रिक लिफाफा पडताळणीमध्ये पात्र ठरल्यास प्रयोगशाळा तपासणी फी जमा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

Aman Mittal

अमन मित्तल (भा.प्र.से.)
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नाशिक